# रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज



छत्रपती शिवाजी महाराजांचा अष्टपैलू पराक्रम केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या कणाकणात रुजला आहे. रयतेच्या उद्धारासाठी त्यांनी केलेल्या महाकाय कर्तृत्वाचा परिचय सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा हा एक छोटा आणि बोलका प्रयत्न.

## रयतेला लेकराप्रमाणे जपणाऱ्या महाराजांचे स्वराज्याचे धोरण काय होते?

काही वतनदार रयतेकडून जबरदस्तीने भरमसाठ कर वसूल करून त्यांना छळायचे. सारा समाज या अत्याचाराने त्रस्त होता.

**शिवरायांनी वतनदारांची ही लूट थांबवली.**

अधिकाऱ्यांना ताकीद

"ठरलेल्या महसूलापेक्षा जास्त वसूल करू नये"

**वतनदारी नष्ट करणारे पहिले राजे - छ. शिवाजी महाराज**

त्यांनी मुलखी-लष्करी सैनिक व अधिकाऱ्यांना वेतन सुरू केले

## शिवरायांनी शेतकऱ्यांची काळजी घेतली

शिवरायांनी जमीन मोजण्याची पद्धत सुरू केली. शेतीच्या उत्पन्नावर आधारित शेतसारा ठरवला.

- शेतकऱ्यांना अन्नधान्य, बी-बियाणे, औतकाठी, जमिनी दिल्या
- बलुतेदार आणि अस्पृश्य जातींना जमिनीचे पट्टे दिले
- शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज दिले
- दुष्काळ पडल्यावर शेतसारा माफ केला



**यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आणि सर्वांच्या घरात सुख आले.**

स्वराज्यापूर्वी वतनदारांचे सैन्य उभ्या पिकातून जायचे, पिकांची नासाडी करायचे. शिवरायांनी स्वराज्याच्या सैन्याला आदेश दिले -



**"खबरदार... रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये"**

"मोहिमेवर सैन्याच्या तुकडीने शेतकऱ्यांच्या उभ्या पिकातून जाता कामा नये"

## शिवरायांनी आया–बहिणींचा सन्मान केला

राजमाता जिजाऊंनी आया-बहिणींचा सन्मान करण्याची शिकवण शिवबांना दिली होती.

बेलवडी येथे सरदार सकुजी गायकवाड याने २७ दिवस लढलेल्या किल्लेदार सावित्रीबाई या शत्रू स्त्रीवर बलात्कार केला.

**शिवरायांनी आपल्याच सरदाराला तुरुंगात डांबले. सावित्रीच्या शौर्याचा सन्मान करून जिंकलेला प्रदेश तिला परत केला.**

शिवरायांची आज्ञा

**"बलात्कार कदापीही न करावा"**





**लुटीत आलेल्या कल्याणच्या मुसलमान सुभेदाराच्या सुनेला महाराजांच्या समोर हजर केले गेले. शिवरायांनी तिला चोळी-बांगडी देऊन सन्मानाने परत पाठवले.**

# शिवाजी महाराजांनी सर्व जाती–धर्मांचा आदर केला

**कित्येक मावळयांनी स्वराज्यासाठी आपल्या जीवाची पर्वा केली नाही.**

- शिवा न्हावी
- मुरारबाजी
- जीवाजी महाला
- मदारी मेहतर
- बाजीप्रभू देशपांडे
- नेताजी पालकर
- हिरोजी फर्जंद
- बहिर्जी नाईक

**गोमाजी नाईक यांचा सल्ला महाराजांनी आयुष्यभर अवलंबला:**

> “ज्यास राज्य करणे त्याने अठरा जाती, चारी वर्ण
> यांस आपापले धर्माप्रमाणे चालवून
> त्यांचा संग्रह करून ठेवावे.”

**शिलेदारांची नेमणूक करताना शिवरायांनी कधीही धर्मभेद केला नाही**

- दर्यासारंग दौलतखान — आरमार प्रमुख
- नूरखान बेग — पहिला सरनोबत
- सिद्दी इब्राहिम — अंगरक्षक
- इब्राहिम खान — तोफखाना प्रमुख
- काजी हैदर — वकील

शिवरायांची आज्ञा:

> **“ज्याचा जो धर्म त्याचा त्यांनी करावा, यात कोणी बखेडा करू नये.”**

**म्हणूनच वेगवेगळया जाती-धर्माचे लोक स्वराज्य स्थापनेत सहभागी झाले.**



## अफजलखानाला मारले कारण तो स्वराज्याचा शत्रू होता!

**ते हिंदू–मुस्लिम युद्ध नव्हते**

अफजलखानाचा वकील
कृष्णाजी भास्कर कुलकर्णी

शिवरायांचा अंगरक्षक
सिद्दी इब्राहिम खान

**मृत्यूनंतर वैर संपले**

शिवरायांनी प्रतापगडावर अफजलखानाची कबर बांधली आणि त्याच्या दिवाबत्तीची सोय स्वराज्याच्या खर्चातून लावून दिली.



## ना जातीचे ना धर्माचे, शिवाजी राजे रयतेचे!

नवं स्वराज्य, नवा विचार, नवा माणूस घडवणाऱ्या मानवतावादी
छत्रपती शिवरायांचे विचार म. फुले, राजर्षी शाहू महाराज यांनी पुढे नेले आणि
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हेच विचार संविधानात उतरवले.
छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा म्हणजे भारतीय संविधानाचा आदर करणे होय.

## शिवरायांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मार्गावर चालण्याचा घेऊया वसा!

### शिवशपथ

स्वराज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मी अशी शपथ घेतो/ते की, शिवरायांच्या विचारांचे मी माझ्या आयुष्यात पालन करेन. त्यांनी सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना केली. शिवरायांची आज्ञा होती की, “ज्याचा जो धर्म असेल, त्याने तो करावा; त्यात कुणीही भांडण उभं करू नये”. मी शिवरायांचा मावळा, कधीही जाती-धर्माच्या नावाने भेदभाव करणार नाही. मी महिलांचा आदर करेन आणि कुणालाही महिलांचा अपमान करू देणार नाही. मी अंधश्रद्धांना बळी पडणार नाही. छत्रपती शिवरायांच्या विचारांना अधिकाधिक लोकांपर्यंत पोचवेन. हेच माझे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन असेल. जय जिजाऊ, जय शिवराय!


**संविधान जागर अभियान**

samvidhanjagar.org | samvidhan.jagar

स्वप्निल फुसे: 79723 45764 | डॉ.श्याम मुडे: 94047 08852 | श्रद्धा रेखा राजेंद्र: 92704 78335 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739